# D.P. Bhosale College, Koregaon

Tal. Koregaon, Dist. Satara (MS), INDIA
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
**NAAC Re-accredited 'A' Grade (CGPA 3.12)**
**ISO 9001:2015 Certified**


**Impact Factor – 6.261** **ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**
**March -2019 Special Issue – 171 (B)**




आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद स्मरणिका

## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

**अतिथी संपादक**
डॉ.व्ही. एस. सावंत
प्राचार्य
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

**कार्यकारी संपादक**
डॉ. बी. एस. चव्हाण
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

**सहयोगी संपादक**
श्रीमती एम. एम. देठे
डॉ. व्ही. व्ही. नावडकर

**मुख्य संपादक**
डॉ. धनराज धनगर (येवला)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.261** **ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**March -2019 Special Issue – 171 (B)**

## भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब

**अतिथी संपादक**
**डॉ.व्ही. एस. सावंत**
**प्राचार्य**
**डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव**
**ता. कोरेगाव, जि. सातारा**

**कार्यकारी संपादक**
**डॉ. बी. एस. चव्हाण**
**प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग**
**डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव**
**ता. कोरेगाव, जि. सातारा**

**सहयोगी संपादक**
**श्रीमती एम. एम. देठे**
**डॉ. व्ही. व्ही. नावडकर**

**मुख्य संपादक**
**डॉ. धनराज धनगर (येवला)**

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : www.researchjourney.net

**© All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 800/-**

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul [M.S.]
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar [M.S.]
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile : 9665398258**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | भटके आणि विमुक्त समाज : सर्वांगीण आयामांचे विचारमंथन | डॉ.सुवर्णा रावळ | 09 |
| 2 | 'बिराड' आत्मकथनातून आलेले बेलदारेत्तर भटक्या समाजाचे चित्रण | डॉ.प्रमोद गारोडे | 13 |
| 3 | नंदीवाले समाजातील जातपंचायत व महाजात पंचायत | डॉ.दत्ता पाटील | 25 |
| 4 | देशीवाद आणि दलित कविता | डॉ.पांडुरंग गायकवाड | 28 |
| 5 | भटक्या – विमुक्त गोंधळी समाजाचा अभ्यास | श्री.विलास देऊळकर | 35 |
| 6 | आदिवासी भटके यांची आत्मकथने | डॉ. शोभा रोकडे | 40 |
| 7 | भुजंग मेश्राम यांच्या काव्यातील वंचितांचे जीवनदर्शन | प्रा. संजय मेस्त्री | 45 |
| 8 | विमुक्त भटक्या जमाती : स्त्रियांच्या समस्या | प्रा. प्रदिप होडावडेकर | 51 |
| 9 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्रीजीवनाचे चित्रण | डॉ. अलका मटकर | 55 |
| 10 | 'गोठण'मधील गोर बंजारा संस्कृती | डॉ.गिरीश मोरे | 59 |
| 11 | भटक्या-विमुक्तांची ऐतिहासिक सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी | प्रा.वामन गावडे | 63 |
| 12 | भटक्या विमुक्तांच्यातील विवाह पद्धती (निवडक जातींच्या अनुषंगाने -गीसावी, नंदीवाले, फासेपारधी) | डॉ. नितीश सावंत | 67 |
| 13 | भटक्या विमुक्तांच्या कलाप्रकारांचे स्वरूप | डॉ. एन. डी. कार्वेकर | 72 |
| 14 | भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | डॉ. सौ. वंदना नढे | 76 |
| 15 | कैकाडी समाज आणि संस्कृती | डॉ. मिलिंद वाव्हळे | 80 |
| 16 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक दु:ख | पूजा कदम व आण्णासाहेब सोनवणे | 89 |
| 17 | भटक्या विमुक्त जमातींचे स्वरूप व वैशिष्ट्ये | प्रा.अभिमन्यू ओहळ | 92 |
| 18 | वंजारी समाजाचे अंतरंग | डॉ. अनिल बांगर | 96 |
| 19 | 'चिनी मातीतील दिवस' या प्रवासवर्णनातील सामाजिकता | प्रा.धनाजी उर्फ धनंजय भिसे | 101 |
| 20 | भटक्या समाजाचे साहित्यातील चित्रण | प्रा. आर. डी. शिंदे | 109 |
| 21 | भटक्या विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | डॉ. सुधाकर बोथीकर | 113 |
| 22 | राजर्षी शाहू महाराज यांनी भटक्या-विमुक्त जमातीच्या उद्धारासाठी केलेले सामाजिक कार्य | प्रा. अजितकुमार पाटील | 120 |
| 23 | 'फेसाटी'तील वंचिताच्या शिक्षण प्रवासाचा शोध | डॉ. आनंद वारके | 127 |
| 24 | पशुपालक भटक्या जमाती : समाज आणि संस्कृती | डॉ. हिराचंद्र मोरे | 133 |
| 25 | भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | डॉ. मीनाक्षी देव | 137 |
| 26 | कोल्हाट्याचे पोर-स्वरूप व विशेष | डॉ. नंदिनी रणखांबे | 141 |
| 27 | फँड्री : एक समाज वास्तवदर्शी चित्रण | अरुणा गायकवाड | 144 |
| 28 | भटक्या विमुक्तांच्या कादंबरीतील स्त्री जीवन | आशा घोडके | 148 |
| 29 | भटक्या जमातीची व्यथा मांडणारी आत्मकथने | ज्ञानेश्वर कदम | 153 |
| 30 | बंजारा समाज : साहित्य आणि संस्कृती | डॉ. राजेश धनजकर | 156 |
| 31 | भटक्या विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | डॉ. राजेंद्र बावळे | 161 |
| 32 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक व सांस्कृतिक स्थिती | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 165 |
| 33 | भटक्या -विमुक्तांच्या आत्मकथनातील समाज व अंधश्रद्धा | प्रा. बाळकृष्ण भोसले | 169 |
| 34 | 'बहादूर थापा आणि इतर कविता' : वंचित समूहाचे चित्रण | डॉ. उमेश सिरसट | 173 |
| 35 | 'भटके –विमुक्त' – संकल्पना स्वरूप व व्याप्ती | डॉ. विद्या नावडकर | 177 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# भटक्या–विमुक्तांच्या आत्मकथनातील सामाजिक व सांस्कृतिकस्थिती

**डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण**
(एम. ए. एम्. फिल. पीएच.डी)
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सम्यक विचारांच्या प्रेरणेतून १९६० च्या दरम्यान दलित साहित्याचा जन्म झाला. नव्या अनभिज्ञ समाजजीवनाचे दर्शन घडवणे, आत्मविष्काराची नवी अनवट वाट निर्माण करणे, आजपर्यंतच्या मराठी साहित्याच्या मर्यादा स्पष्ट करुन एकूणच मराठी साहित्याचे विचारविश्व विस्तारत करणे असे अनेक प्रकारचे योगदान दलित साहित्याने दिले. महाराष्ट्रातील दलित साहित्याने भारतीय साहित्यास प्रेरणा दिली आणि भारताच्या वेगवेगळया प्रदेशात दलित साहित्याची निर्मिती झाली. आज त्याप्रमाणात दलित साहित्याची चर्चा होत नसली तरी दलित साहित्य निर्मितीचा प्रवाह अखंडपणे वाहत आहे. दलित साहित्य गतिबध्द झाले असेल तर आजची जागतिकीकरणाची प्रक्रिया त्यास कारणीभूत असू शकते या प्रक्रियेत दलितांचे भले होईल असे काहींना वाटते तर सारेच वंचित घटक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपुरते उद्ध्वस्त होतील. आज छोटे उद्योग बंद पडत आहेत. पारंपारिक व्यवसाय देशोधडीला लागले आहेत. खाजगी क्षेत्रात मागास जमातींसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण, संरक्षण नाही. भटक्यांना कोणतेही भविष्य उरले नाही या स्थितीत काय लिहावे असा सभ्रम लेखकांपुढे आहे. म्हटले तर ही स्थिती साहित्यनिर्मितीस अनुकूल ठरावी अशी आहे. पण भविष्यातील अंधार दिशा दाखवत नाही. त्यामुळे एकूणच साहित्यनिर्मितीत गतिरोध आहे असे वाटते. हीच स्थिती भटक्या–विमुक्तांच्या साहित्यात झालेली आहे.

दलित साहित्याचा जोरकस प्रवाह निर्माण झाला आणि समाजातील साऱ्या उपेक्षित समाजातील लेखक दलित साहित्याच्या छत्रीखाली एकत्र आले आणि दलित साहित्याचे वेगवेगळे पैलू प्रकाशमान झाले. एक नवेच अनुभवविश्व घेऊन प्रत्येक कलाकृती दलित साहित्यात प्रकाशमान होऊ लागली. जीवनानुभवाच्या अनेक कक्षा विस्तारीत होत राहिल्या. तसेच समाज आणि त्यांच्या संस्कृतीच्या भिन्न अभिव्यक्ती दलित साहित्यात होत राहिली. एकमेकांपासून सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या वेगळा असणारा जनसमूह दलित या संज्ञेत समाविष्ट होणाऱ्या साहित्य परंपरेत लेखन करीत आला आहे. हे समूह एकमेकांपासून केवळ सांस्कृतिकदृष्ट्याच वेगळे होते असे नाही. तर त्यांचे जागण्यचे प्रश्नही परस्परांपासून भिन्न आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणादेखील वेगवेगळया आहेत. ही गोष्ट आपण ध्यानातच घेतलेली नाही. अनुसूचित जातींच्या लोकांना अत्यंत हीन जीवन जगावे लागत होते. अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागत होते, बहिष्कृततेच्या जीव घेण्या समस्यांशी त्यांना संघर्ष करावे लागत होता. भूक, उपासमार हे प्रश्नही त्यांना सतावत होते. हे सर्व खरे असले तरी त्यांना एक गाव होते, गाव आण गावकीत त्यांना स्थान होते. गावाबाहेर का असेना त्यांना घर होते आणि पांढरीत पाय ठेवायला का असेना त्यांना स्वत:ची शेती होती. अनुसूचित जमातीच्या लोकांची वस्ती जंगलात होती आणि एकेकाळी जंगल संपत्तीवर त्यांचा हक्क आणि अधिकार होता. आधुनिक विकास आणि सुखसुविधेपासून हा समाज हजारो वर्षे वंचित होता. भटक्या विमुक्तांची स्थिती या समुहापेक्षा अत्यंत भिन्न होती. कोणत्याच प्रकारचा आधार नसलेला, गावत घर नाही, गावगाडयात स्थान नाही, रानात जमीन नाही अशा निराधार अवस्थेत भटकत फिरणारा हा समूह आहे. स्वत:चा ठरलेला व्यवसाय नाही, कौशल्य नाही त्यामुळे भीक मागून दुसऱ्यांच्या दयेवर जगणे आणि भूक भागवण्यासाठी भुरटया चोऱ्यामाऱ्या करणे असे त्यांचे जीवन होते. त्यांनी स्वत:भोवती आणि स्वत:च्या संस्कृतीभोवती एक अदृश्य स्वरुपाचे कुंपण निर्माण करुन घेतलेले होते. त्यामुळे विकास दिसत असला, समृध्दी नजरेला पडत असली तरी भटक्या–विमुक्तापासून की कोसो मैल दूर होती. म्हणून मला वाटते

की, अनुसूचित जाती आणि जमातीपेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्टया भटक्या-विमुक्तांचा समूह अत्यंत वेगळा आहे. त्यामुळे हा वेगळेपणा लक्षात न घेता त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन योग्यप्रकारे होईल असे मला वाटत नाही.

अनुसूचित जातींच्या लेखकांनी लिहिलेल्या आत्मकथनपर लेखनाची प्रेरणा आंबेडकरी होती, डॉ.आंबेडकरांचा क्रांतीदर्शी विचार चळवळींच्या माध्यमातून दलित तरुणांच्या मनात रुजलेला होता आणि त्या विचाराचा अविष्कार दलित आत्मकथनांमधून झालेला आहे. भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथन लेखनाची प्रक्रिया आंबेडकरी विचारांशी निगडीत होती ही गोष्ट खरी आहे. पण असे असले तरी प्रदेश आणि जातीपरत्वे हया प्रेरणा वेगवेगळयाही असलेल्या दिसतात. अनुसूचित जातीमधील मातंग डॉ.आंबेडकराप्रमाणेच लहूजी वस्ताद आणि अण्णाभाऊ साठे यांच्याविषयी आदर बाळगतात आणि साहित्य निर्मितीच्या प्रेरणा त्यांच्या विचारांशी जोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. उत्तरेतील चर्मकार संत रोहीदास यांना प्रेरणास्थानी ठेवताना आढळतात. आदिवाशी आणि भटक्य-विमुक्त जमातींना आपल्या साहित्य निर्मितीच्या प्रेरणा बिसरा मुंडा, तंटया भिल्ल, उमाजी नाईक या क्रांतिकारकांच्या विचारप्रेरणांशीही जोडून घेतात. थोडक्यात व्यापक अर्थाने डॉ. आंबेडकरांशी साहित्य प्रेरणांचा अनुबंध असला तरी वेगवेगळया जमाती आपापल्या जातीपुरुषांच्या महान आणि क्रांतीदर्शी विचारांशी साहित्यनिर्मितीचा अनुबंध असल्याचे जाणीवपूर्वक सांगतात. त्यामुळे भटक्या-विमुक्तांच्या साहित्याचा किंवा आत्मकथनांचा अभ्यास करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबरच इतरांच्या प्रेरणा ध्यानात घेणे आवश्यक आहे असे मला वाटते.

त्यांचे जगणे हीच ग्रामीण साहित्याच्या निर्मिती प्रेरणा होती. त्यामुळे भूमिका घेताना ग्रामीण लेखकांची अडचण होत असे, तो प्रश्न त्यांनी नंतर म. जोतीराव फुले यांच्या विचारांशी जोडून सोडवला, थोडयाफार फरकाने भटक्या-विमुक्त जमातींच्या लेखकांच्या निर्मिती प्रेरणेच्या संदर्भात ग्रामीण लेखकांप्रमाणेच अडचण झालेली आहे. ही आजची वस्तुस्थिती आहे.

सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्टयांचा विचार करता अनुसूचित जाती आणि जमातीपेक्षा भटक्या-विमुक्तांच्या परंपरा आणि सांस्कृतिक जीवन वेगळे आहे. अर्थात ज्या चार प्रवर्गात भटक्या-विमुक्तांची विभागणी करण्यात आलेली आहे. त्यांच्यातही सांस्कृतिक भिन्नता असलेली दिसते, नव्हे मोठी तफावत यासंदर्भात आढळते. हा फरक काही अभ्यासक लगेच मान्य करतील असे नव्हे पण वस्तुस्थिती काय आहे हे ध्यानात घ्यावे लागेल असे मला मनापासून वाटते.

आतापर्यंत भटक्या-विमुक्तांची जी आत्मकथने महत्वाची म्हणून मान्य करण्यात आलेली आहेत. त्या जमाती पारंपारिक जीवन जगणाऱ्या आहेत. सत्तासामर्थ्यच्या बळावर ज्या जमातींचा अंतर्भाव भटक्या-विमुक्तांमध्ये नंतर झाला आहे. त्या जमातींमधील लेखकांची आत्मकथने उपलब्ध नाहीत. ही बाब मी येथे आधोरेखित करतो. त्यामुळे भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनांचे मूलमापन करताना ही सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे असेही माझे मत आहे.

अनुसूचित जमातीमधील तरुणांची जडणघडण आंबेडकरी विचारातून झाली, त्याचा अविष्कार त्यांनी आत्मकथेत केला, तशी जागृती भटक्य-विमुक्त तरुणांमध्ये मोठया प्रमाणात झालेली आढळत नाही. या समाजातील अशिक्षित लोकांना आजही देशाचे पंतप्रधान कोण आहेत. राज्याचे मुख्यमंत्री कोण आहेत याची माहिती नसते. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य, त्यांचे क्रांतीदर्शी विचारांची नीट जाणीव या समाजाला झालेली आहे. असे म्हणणे अज्ञान ठरेल. या जमातींमधील लेखक जेव्हा लिहू लागतो. तेव्हा त्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आणि त्यांच्या विचारांची ओळख होते, भटक्यामधील जनसामान्य समाज आजही बाबासाहेबांच्या तत्वज्ञान आणि कार्यापासून फार दूर आहे असे दिसते. समाजाच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा थेट नव्हे तर अप्रत्यक्षपणेच बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी जोडता येतील असेच म्हणावे लागते. अशा अनेक कारणाने दलित साहित्यापेक्षा भटक्या-विमुक्तांचे साहित्य आणि आत्मकथनांचे स्वरुप वेगळे आहे. ही वस्तुस्थिती आपण ध्यानात घ्यायला हवी.

दलित लेखकांनी स्वत:ची आणि समाजाची व्यथा-वेदना इतरांना सांगण्याच्या दृष्टीने आत्मकथेने लिहिली. आपली संस्कृती, समाजजीवन, भोगाव्या लागणाऱ्या दु:खाची जाणीव दलितेरांना सांगावी, आपले दु:ख समाजासमोर मांडावे, वर्षानुवर्षे या संस्कृतीने आपल्यावर अन्याय केला, छळ केला, अत्यंत हिन लेखले, पशूपेक्षाही वाईट जीवन आपण सहन केले असे अनेक प्रश्न समाजासमोर मांडण्यासाठी दलित लेखकांनी आत्मकथने लिहिली. जाणीवपूर्वक आत्मकथनांचे लेखन त्यांनी केले. त्याचा एक अपेक्षित परिणामही झाला. संवेदशील समीक्षकांनी या आत्मकथनांची दखल घेतली. आत्मकथनांचे स्वरुप उलगडून सांगितले आणि दलितेरांच्या मनामध्ये आपण या समाजाचे गुन्हेगार आहोत अशा अनुकूल जाणीवही निर्माण झाली. दलित समाजातील लोक आपले बांधव आहेत, त्यांना विकासाची संधी दिली पाहिजे. त्यांचा सामाजिक स्तर उंचावला पाहिजे, अशी भावना समाजात निर्माण झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाच्या अभ्युदयासाठी काही विशेष तरतूदी संविधानामध्ये केलेल्या होत्या. त्याआधारे दलितांना हक्क मिळाले आणि विकासाचा मार्ग खुला झाला. कायदेशीर तरतुदीची अमंलबजावणी होण्यासाठी दलित आत्मकथनांनी अनुकूल वातारवणाची निर्मिती केली. हे दलित आत्मकथनांचे महत्वाचे योगदान आहे. यात शंका नाही.

भटक्या-विमुक्तांमधील लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड यासारख्या लेखकांनी सहजपणे जाणीवपूर्वक आत्मकथनांची निर्मिती केली. दलित आत्मकथनांच्या निर्मितीमागील हेतू त्यांनी लक्षात घेऊन त्या हेतूनुरुप आत्मकथने लिहिली. भटक्य-विमुक्तांच्या इतर अनेक आत्मकथनांमध्ये ही जाणीवपूर्वकता आढळत नाही. असलीच तर ती अगदीच अल्पप्रमाणात आढळते. अशी जाणीवपूर्वकता नसल्याने भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनांचे बलस्थान वृध्दिंगत झाले की ही आत्मकथने शबलीत झाली याचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल.

भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनांमध्ये आलेले चित्रण अस्वस्थ आणि थक्क करणारे आहे. कैकाडी, कुडमुडे जोशी, गोंधळी, वडार, उचले, पारधी, लमाण, बेरड, कोल्हाटी, वैदू अशा अनेक जमातींमधील तरुणांनी आत्मकथने लिहिली आहेत. त्याची जगण्याची धडपड, त्यांचे होणारे शोषण, शोषणामुळे भोगावे लागणारे दु:ख, समाजातील अंधश्रध्दा, जातपंचायती आणि त्याअंतर्गत सुरु असलेले शोषण, सावकारशाही, देवदेवतांचा पगडा आणि एकूणच त्यांच्या आयुष्यातील अनेक विदारक अनुभवांचे चित्रण भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनातून आलेले आहे.

या साऱ्या आत्मकथनामध्ये अभिव्यक्त होणाऱ्या चित्रणातून दैन्य, दारिद्र्य, शोषण यांचे दर्शन होत असले तरी प्रत्येक जातीजमातींचे प्रश्न वेगळे आहेत. जीवनपध्दती, संस्कृती, भाषा वेगवेगळी आहे. प्रत्येकांच्या दु:खाचे कारण एकच नाही. वेगवेगळया कारणांनी त्यांच्या वाटयाला दु:ख आलेले आढळते. भटक्या जमाती गावापासून दूर असतात निश्चित स्वरुपाचा व्यवसाय नसतो, कौशल्याच्या कला नाहीत शिवाय त्यांच्यावर जन्मजात गुन्हेगारीचा शिक्का मारलेला असल्याने त्यांच्या जगण्यामरण्याच्या कहाण्या वेगळया आहेत. कोल्हाटी स्त्रीला चिरा उतरावा लागतो. पुढील आयुष्याला चिरा उतरवणारी व्यक्ती तिचा मालक ठरतो आणि सर्व प्रकारचे हक्क तिच्यावर गाजवत असतो. हे 'कोल्हाटयाचे पोर' मधील समाजवास्तव आहे. भटक्यांना तीन दिवसांपेक्षा अधिक काळ एक गावात मुक्काम करता येत नाही. गावात येताना आणि निघून जाताना गावच्या पाटील-कुलकर्ण्याकडे हजेरी द्यावयाची. माणसाची आणि जनावरांची मोजदाद करुन तसा दाखला त्यांच्याकडून घ्यावयाचा अशी अमानुष प्रथा रुढ होती. हे सारे करुनही कुठे चोरी झाली तर याच जमातींना जबाबदार धरावयाचे अशी व्यवस्था होती. ही गोष्ट खरी आहे की पाटीची भूक भागवण्यासाठी भुरटया चोऱ्या-माऱ्या यापैकी काही जमातीमधील लोक करीत असतील. पणा अशा छोटया चोरीची शिक्षा मात्र भयंकर असते. गावातील धनदांडग्यांचा त्रास तर या जातीतील लोकांना सहन करावा लागतोच पण पोलीसांकडून होणार अमानुष छळही, जीवघेणा असतो. भटक्यांच्या लेकीबाळीच्या अब्रुला सवर्णांच्यादृष्टीने काडीमात्र किंमत नसते. हक्कांची उपभोगाची वस्तू म्हणूनच रक्षणकर्ते पोलिस आणि गावातील धनदांडगे त्याकडे बघत असतात. गावातील सावकार आणि जातीतील सावकार हे दोघेही शोषण करीत असतात एकाकडून कर्ज, घ्याचचे कर्जफेडीसाठी दुसऱ्याकडून पुन्हा कर्ज घ्यायचे असे हे दुष्टचक्र अखंडपणे सुरु असते. अशा अनेक गोष्टीचे चित्रण 'बेरड', 'चोरटा', 'तांडा', 'रानभैरी', 'गबाळ', 'उचल्या',

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

'तीन दगडाची चूल', 'मरणकळा', अशा अनेक आत्मकथनामधून आले आहे. शिक्षण घेणं पाप आहे, असे केले तर देवीचा कोप होतो. असे चित्रण 'उचल्या' मध्ये येते. पोरगी शिकली की हुकली असे दृश्य 'मरणकळा' मध्ये येते. जातपंचायतीच्या शोषणाच्या अनेक तऱ्हा गबाळ, मरणकळा, उपरा अशा अनेक आत्मकथनामधून येतात. भटक्यांमध्ये अनेक जाती–उपजाती आहेत. त्यांच्यातही श्रेष्ठ कनिष्ठतेची उतरंड आहे. त्याचे चित्रण तीन दगडाची चूल, मरणकळा, रानभैरी, चोरटी, बेरड ऐरणीच्या घना, दे दान सुटे गिरान अशा आत्मकथनामधून आलेले आहे.

प्रत्येक जमातींच्या सांस्कृतिक संरचना वेगळी आहे. देवदेवता वेगळया आहेत. जातपंचायतीचे कायदे वेगळे आहेत, विधी, आराधना, अंधश्रध्दा, नैतिक संकल्पना वेगळ्या आहेत. प्रत्येक जमातींची स्वतंत्र बोली असतात. जातीअंतर्गत व्यवहार बोलीतून आणि जातीबाहेरील व्यवहार स्थानिक भाषेतून त्यांना करावा लागतो. जातीजमातीमधील परस्परसंबंध आणि अन्य लोकांशी असणारे परस्परसंबंध अशा अनेक गोष्टीचे चित्रण आत्मकथनांमध्ये येते.

एका मोठया संस्कृतीच्या आत वास्तव्य करणारी पण स्वत:चे वेगळे सांस्कृतिक वर्तुळ घट्टपणे सांभाळत जगणारी अशी एक धक्कादायक, अनोखी आणि विदारक जीवन दर्शन घडविणारी ही सांस्कृतिक ही परंपरा भटक्या–विमुक्तांच्या आत्मकथनामधून प्रकट झाली आहे. म्हणून या भटक्या–विमुक्तांची सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती ध्यानात घेऊनच त्यांच्या आत्मकथनांचे मूल्यमापन करावे लागेल. केवळ दलित साहित्य या संज्ञेत या आत्मकथनांच्या समावेश करून मूल्यमापन करणे अपुरे ठरेल नव्हे, अन्यायकारकही होईल.

**संदर्भ :**

१. उपरा(आत्मकथन) : लक्ष्मन माने,चौथी आवृत्ती १९८८ या मुक्कामावरून– मनोगत, ग्रंथाली, मुंबई
२. दलित साहित्याचा इतिहास : प्राचार्य डॉ. म.सु.पगारे, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव
३. अक्षरवैदर्भी : संपा. डॉ.सुभाष सावरकर, मार्च २०११.